नियमित फौजदारी खटला नं.३१०/२०२२
निशाणी- १७

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- अंजली सचिन हासे
वयः- ३० वर्षे, धंदाः- शेती.
राहणार- मुपो. राजापुर, ता. संगमनेर, जि.अहमदनगर.

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री.ए.एस.यादव यांचेकडूनः-

१. फिर्यादी नितीन हासे माझे दिर आहे. मी सन २०२० मध्ये आयटेल कंपनीचा स्मार्ट फोन वापरत होते. त्यामध्ये व्हॉटसअॅप व इन्स्टाग्राम मी वापरत होते. दि.२३-०९-२०२१ रोजी नितीन हासे यांच्या इन्स्टाग्राम वरुन मला मेसेज आले होते. त्यानंतर मी नितीन हासे यांना फोन केला व त्यांना सांगितले की, त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरुन मेसेज आले. नितीन हासे म्हणाले की, ते इन्स्टाग्राम अकाउंट वापरत नाही. त्यानंतर मी मला आलेले मेसेजचे स्क्रीनशॉट काढून नितीन हासे यांच्या व्हॉटसअॅपला पाठवले. नितीन हासे यांनी त्यानंतर मला सांगितले की, नाव माझे आहे परंतु अकाउंट माझे नाही, बनावट अकाउंट असू शकते. त्या इन्स्टाग्राम अकाउंट वरुन मला असे मेसेज आले होते की, "वहिनी तुम्ही मला खूप आवडता". त्यानंतर नितीन हासे यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. तो मोबाईल मी तपासाकामी पोलीसांना दिला नव्हता. या घटनेनंतर माझ्या अपघातात तो मोबाईल फुटला. तो मोबाईल आता माझ्याकडे नाही. मला आर्टिकल बी-१ ते बी-१२ वरील स्क्रीनशॉट दाखवले. हेच मेसेज मला आले होते. मला असे समजले की, शुभम गाडेकर यांने नितीन हासे यांचे इन्स्टाग्रामचे बनावट अकाउंट उघडले होते व त्यानेच ते मेसेज मला पाठवले होते. आरोपी शुभम गाडेकर आमच्या शेजारी राहतो. सदर मेसेजमुळे माझी बदनामी झाली म्हणुन तक्रार दिली होती. त्यावेळी मला आलेले मेसेज आता माझेकडे उपलब्ध नाहीत.

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती. डी. आर. टाक यांचेकडूनः-

२. माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे. या घटनेपुर्वी सहा ते सात महिने मी व्हॉटसअॅप व इन्स्टाग्राम अकाउंट वापरत होते. नितीन हासे यांनी तक्रार दिली त्यावेळी मला कळाले की, हे बनावट अकाउंट आहे. मला ज्या इन्स्टाग्राम अकाउंट वरुन मेसेज आले त्या अकाउंटवर एक आठवडा संभाषण चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, नितीन हासे यांना मी त्या संभाषणाचे फक्त काही मेसेज

पाठवले, संपुर्ण मेसेज पाठवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नितीन हासे यांना पाठवलेल्या मेसेजमधील काही मजकुर मी काढून टाकला होता. हे म्हणणे खरे आहे की, नितीन हासे नावाच्या एकपेक्षा जास्त व्यक्ती असू शकतात. नितीन हासे यांनी सायबरला केस केली त्यावेळी मला कळाले की, सदर मेसेज हे कोणीतरी दुसरा व्यक्ती करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, नितीन हासे यांनी सायबर पोलीस स्टेशनला तक्रार दिली त्यावेळी मी त्यांच्यासोबत नव्हते. मला पोलीस स्टेशनला जबाबासाठी बोलवले नव्हते. मी पोलीसांना कधीही जबाब दिलेला नाही. पोलीसांनी कुठल्याही कागदावर माझी सही घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा मोबाईल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा मोबाईल कधीही पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला जे मेसेज आले होते त्यामध्ये नितीन हासे यांची बदनामी होईल असा मेसेज नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नितीन हासे यांनी सांगितल्यावर मला कळाले की, या आरोपीने गुन्हा केलेला आहे. मला ज्या अकाउंटवर मेसेज आले होते ते माझे इन्स्टाग्रामचे अकाउंट आता बंद आहे. त्यावेळी माझेकडे असलेला मोबाईल नंतर अपघातात फुटल्याने मी नविन मोबाईल घेतला व नविन अकाउंट उघडले. हे म्हणणे खरे नाही की, मला ज्या पध्दतीचे मसेज आले त्याच पध्दतीचे मेसेज मी प्रतिउत्तरात पाठवले. हे म्हणणे खरे नाही की, त्या अकाउंटवरुन मेसेज आल्यानंतर एक-दोन वेळेला मीपण मेसेज पाठवले. हे म्हणणे खरे आहे की, मला आलेले मेसेज या आरोपीने पाठवले याची मला वैयक्तीक माहिती नाही, त्याबद्दल मला नितीन हासे यांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपी विरुध्द माझी तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला तसे मेसेज आले होते हे दाखवण्यासाठी आता माझेकडे पुरावा नाही. या घटनेबाबत मी कोठेही कोणतीही तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.
फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-

( रा. धों. चव्हाण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

समक्ष,
सही/-

( रा. धों. चव्हाण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.१४/१२/२०२३.